कलाकार (AR) (एकूण आरक्षण २%)	होणाऱ्या प्राप्तीवर निर्भर असून त्यावरच प्रामुख्याने त्याची उपजिवीका अवलंबून आहे, अशाच व्यक्ती कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. उपजिविकेकरिता इतर व्यवसायावर अवलंबून असून फावल्या वेळी कलेची उपासना, जोपासना करणारी व्यक्ती या प्रवर्गसाठी पात्र नाही. **कलाकार या प्रवर्गासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने महाराष्ट्र राज्य कला/सांस्कृतिक संचालनालय कडुन म्हाडाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र** संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणी वेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती (Capture) करुन पात्रता निश्चिती केली जाईल.	कला/ सांस्कृतिक संचालनालय,महाराष्ट्र शासन यांनी दिलेले प्रमाणपत्र.
शासन स्वेच्छा निर्णया खालील आरक्षण (एकूण आरक्षण २%)	मा. न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रवर्गास स्थगिती असल्याने सदर प्रवर्गातील सदनिका सर्वसाधारण जनता या प्रवर्गासाठी परावर्तीत करण्यात आलेल्या आहेत.	
सर्वसाधारण जनता (GP) (एकूण आरक्षण ५० %)	महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास(जमिनीचे विल्हेवाट) नियम १९८१ मधील नियम १३ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापक, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम १६ मध्ये अंतर्भुत असलेले आरक्षित गट/प्रवर्ग वगळून प्रस्तुत योजनेतील ५०% सदनिका या सर्वसाधारण जनतेसाठी उपलब्ध असतील.	

७.सदनिकांची विक्री किंमत व ती भरणा करावयाच्या सर्वसाधारण तसेच विशेष अटी व शर्ती

अ. म्हाडा गृहनिर्माण योजना

योजनेतील प्रत्येक सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती असून पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा तसेच सदनिकांच्या संख्येत वाढ वा घट करण्याचा अंतिम अधिकार राहील.तसेच सदनिकांच्या विक्री किंमतीमध्ये वाढ झाल्यास वाढीव किमंत अर्जदारांना भरणे बंधनकारक असेल.

सदनिकांची विक्री किंमत भरण्याची पध्दत:-

अ.१ मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्या दि.०१/०४/२०१७ रोजीच्या परिपत्रकात नमूद सदनिका शुल्काचा भरणा करणेबाबतची कार्यवाही खालील नमूद टप्प्यात विषद करण्यात येत आहे.

अ.२ विजेत्या अर्जदाराचे स्विकृती पत्र Online सादर केल्यानंतर तात्पुरते देकार पत्र अर्जदाराच्या Login ID वर पाठविण्यात येईल. सदनिकेची किंमती अदा करण्यासाठी/ भरण्यासाठी पुढील वेळापत्रकानुसार (टप्प्या-टप्याने) किंमत भरावयाची आहे.

टप्पा	भरावयाची रक्कम	मुदत
१.	सदनिकेच्या एकूण किंमतीच्या २५% रक्कम	तात्पुरते देकार ई-मेल दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत रक्कम भरावयाची आहे.
२.	उर्वरित ७५% रक्कम	टप्पा १ च्या मुदतीनंतर पुढील ६० दिवसांत रक्कम भरावयाची आहे.

टप्पा १:-प्रथम टप्प्यातील २५% रक्कमेचा भरणा करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून ४५ दिवसांनंतर) नियमाप्रमाणे व्याज (म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार) आकारणीच्या अधीन राहून १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल. या कालावधीतही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांका पासून ६० दिवसांत) प्रथम टप्प्यातील २५% रक्कम न भरल्यास सदनिकेचे वितरण **कोणतीही पुर्वसुचना न देता** रद्द केले जाईल.

टप्पा २:- टप्पा १ च्या मुदतीनंतर पुढील ६० दिवसांत सदनिकेची उर्वरित ७५ टक्के रक्कम भरणे बंधनकारक असते. सदर कालावधीतही (७५% रक्कमेकरिता ६० दिवस) अर्जदाराने ७५% रक्कम भरणा न केल्यास, १०५ दिवसांचा विहित कालवधी संपुष्टात आल्यानंतर नियमाप्रमाणे व्याज (म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार) दराने व्याज आकारणीच्या अधिन राहून अर्जदारास अधिकतम ९० दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल. या करिता अर्जदारास विहित कालावधीत मुदतवाढीचा अर्ज सादर करावा लागेल. या नंतरही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांका पासून १९५ दिवसांत) सदनिकेची किमंत अदा करण्यात अर्जदाराने कसूर केल्यास किंबहुना न भरल्यास तात्पुरते देकारपत्र तात्काळ रद्द करण्यात येईल तथा अर्जदाराने भरणा केलेल्या रक्कमेतुन

सदनिकेच्या किंमतीच्या १% एवढी रक्कत समपहरण (Forfeit) करुन उर्वरित रक्कम कोणतेही व्याज न देता अर्जदाराच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

अ.३ ज्या अर्जदारांना सदनिकेची १००% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रक्कमी) भरावयाची आहे, असे अर्जदार तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत सदनिकेची १००% रक्कम भरु शकतात.

अ.४ सदनिकेच्या विक्री किमंतीचा भरणा करण्यासाठी लाभार्थीला वित्तिय संस्थेकडून गृहकर्ज घ्यावयाचे असल्यास अशा अर्जदारांनी ज्या वित्तिय संस्थेकडुन कर्ज घ्यावयाचे आहे. अशा वित्तिय संस्थेच्या अधिकाऱ्याकडून अर्जदारामार्फत कार्यालयात ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी करणे आवश्यक आहे. यानंतर सदर बँकेचे नावे कार्यालयाद्वारे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

अ.५ सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांनी **तात्पुरते देकारपत्र निर्गमित करण्यापूर्वी** अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेल्या अनामत रक्कमेतुन विनाव्याज २५% रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करुन उर्वरित रक्कमेचा परतावा करण्याचा येईल.

अ.६ अर्जदार सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने सादर केलेले कागदपत्रे बनावट आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करुन सदनिका ताब्यात घेण्यात येईल व भरणा केलेली विक्री किंमत संपूर्ण समपहरण/ Forfeit केली जाईल.

अ.७ अर्जदार किंवा त्याचे पती/ पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात/ विविध संकेतामध्ये अर्ज केल्यास व त्याचे विविध प्रवर्गात/ विविध संकेतामध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडती मध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकाच प्रवर्गात / एकाच संकेतात एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गामध्ये / संकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असेल तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल. अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जांसाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज रु.१०००/- इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट करुन परतावा करण्यात येईल.

अ.८ तात्पुरते देकारपत्र (Provisional Offer Letter) दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारली किंवा कोणत्याही कारणास्तव वितरण रद्द करण्यात आल्यास (उपरोक्त अ.७ वगळून) अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतुन, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम रक्कम समपहरण करुन उर्वरित रक्कम विनाव्याज परतावा करण्यात येईल. अर्जदाराने सदनिकेच्या विक्री किंमतीपैकी निरंक रक्कमेचा भरणा केल्यास तथा उपरोक्त समपहरण करावयावची रक्कम अनामत रक्कमेपेक्षा कमी भरल्यास, अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येणार नाही.

अ.९ सदनिका वितरणाचे तात्पुरते देकारपत्र दिल्यानंतर सदनिकेची रक्कम अर्जदार किंवा पती/ पत्नी यांचे बँक खात्यामधूनच अदा करणे बंधनकारक आहे. इतर व्यक्तीच्या बँक खात्यामधून अदा केलेली रक्कम ग्राह्य धरण्यात येणार नाही.

अ.१० या व्यतिरिक्त यशस्वी अर्जदारांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार इतर आवश्यक करांचा भरणा करणे बंधनकारक असेल.

अ.११ सदनिकेस विक्री व्यतिरिक्त वस्तु व सेवा कर (Good & Service Tax) / देखभाल खर्च लागू झाल्यास सदर कर संबंधित कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच सदनिकेचा ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

अ.१२ सदनिकांचे ताबापत्र स्थानिक स्वराज्य संस्थेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पाठविता येईल. तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास उशीर झाल्यास त्याला म्हाडा जबाबदार राहणार नाही. तत्पुर्वी अर्जदारांची पात्रता निश्चित करुन पात्र/अपात्रतेचा निर्णय म्हाडाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

अ.१३ यशस्वी लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, भुईभाडे व अकृषिक आकार अदा करावा लागेल.

अ.१४ सार्वजनिक सुविधांकरीता येणार देखभाल व दुरुस्ती खर्च सदनिकाधारकांस स्वतंत्रपणे नियोजित सोसायटीकडे भरावा लागेल.

अ.१५ पुणे मंडळाने मागणी केल्यानुसार लाभार्थ्यास सदनिकेची संपूर्ण किंमत सदनिका ताब्यात घेण्यापुर्वी अदा करावी लागेल.

अ.१६ समाईक विद्युत जोड, पाणी जोडसाठी नियोजित सोसायटी मार्फत लाभार्थ्यास स्थानिक स्वराज्य संस्थेकडे अर्ज करुन नियमानुसार जोड घेणे आवश्यक आहे.

ब. प्रधान मंत्री आवास योजना

१. अर्जदार व अर्जदाराच्या कुटुंबाच्या नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे.

२. अर्जदारास अर्ज करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नोंदणी असणे अथवा नोंदणी करणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घटक क्र.३ मध्ये नोंदणी केलेली असल्यास अर्ज क्रमांक अर्जात नमुद करणे आवश्यक आहे.

३. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी कुटुंबामध्ये पती,पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल (विवाहीत अथवा अविवाहित सज्ञान कमविती व्यक्ती हे स्वंतंत्र कुटूंब म्हणून ग्राह्य धरण्यात येईल) तसेच सदनिकांसाठी अर्ज कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील. जर अर्जदार व त्याची पती/ पत्नी दोघेही सोडतीत यशस्वी झाले, तर त्याला/तिला कुठलीही एकच सदनिका अनुज्ञेय राहील.

४. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांस केंद्र व राज्य शासनाचे मिळून एकूण रु.२,५०,०००/- प्रति सदनिका अनुदान मिळेल.

५. पात्र अशा लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क (Stamp Duty), नोंदणी शुल्क, भुईभाडे व अकृषिक आकार अदा करावा लागेल.

६. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाने मुद्रांक शुल्कात सवलत जाहीर केली असून, योजनेतील पात्र लाभार्थ्यांना फक्त रु.१०००/- मुद्रांक शुल्क (Stamp Duty) भरावी लागेल.

७. सदर योजना अग्रीम अंशदान तत्वावर राबविण्यात येत असल्याने पात्र लाभार्थ्यांना सदनिकांची विक्री किंमत बांधकामाच्या प्रगतीपथानुसार मंडळाने निर्धारित केलेल्या हप्त्यानुसार भरावी लागणार आहे.

८. शासन निर्णय गृहनिर्माण विभाग, दि.१८/०८/२०१६ अन्वये, प्राप्त लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सदनिकांची पुनर्विक्री सदनिकांचा ताबा मिळाल्यापासून १० वर्षे करता येणार नाही.

९. अर्जदाराचे व त्याचे कुटुंब (पती व पत्नी) यांचे एकत्रित वार्षिक उप्पन्न रु.३,००,०००/- पेक्षा जास्त नसावे.

१०. या अटी शर्ती व्यतिरिक्त माहिती पुस्तिकेतील इतर अटी व शर्ती यशस्वी अर्जदारास लागु असतील.

विशेष सुचना :- यशस्वी झालेल्या अर्जदारांनी अनामत रक्कमेचा परतावा मागितल्यास अर्जासोबत भरलेल्या रक्कमेतून २५% रक्कम कपात करण्यात येईल. तथापि अर्जदारास तापुरते देकार पत्र (Provisional Offer Letter) दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारली किंवा कोणत्याही कारणात्सव वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरीत रक्कम कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल. अर्जदाराने सदनिकेच्या विक्री किंमतीपैकी निरंक रक्कमेचा भरणा केल्यास तथा उपरोक्त समपहरण करावयाची रककम अनामत रक्कमेपेक्षा कमी भरल्यास, अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येणार नाही.

क) २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना व १५% सामाजिक गृहनिर्माण योजना.

१. सदर योजनेचे बांधकाम विकासकामार्फत करण्यात आले आहे. त्यामुळे योजनेतील सदनिकांच्या बांधकामाचा दर्जा, नियोजन, देखभाल, सोई सुविधा, पार्किंग इ. बाबत विकासक जबाबदार राहील. या बाबत काही तक्रार असल्यास अर्जदाराने संबंधीत महानगपालिका /रेराकडे दाद मागावी.

२. विजेत्या अर्जदारास देकारपत्राचे वितरण केल्याच्या दिनांकापासून संबंधित विकासकासोबत अर्जदाराने ६० दिवसात सदनिकेचा विक्री करारनामा करणे बंधनकारक आहे. या कालावधीत विक्री करारनामा न केल्यास म्हाडाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

३. विकासकांनी लाभार्थ्यांना वितरीत होणाऱ्या सदनिकांची पाहणी करु द्यावी. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करु नये.

४. लाभार्थ्यांकडून भरणा करण्यात येणाऱ्या रकमेचे वेळापत्रक हे महारेराच्या तरतुदीनुसार असावे, तसेच विकासकाने देकार पत्रामध्ये नमुद केलेल्या विक्री किंमतीवरच लाभार्थ्यांशी करारनामा करावा. त्यामध्ये अन्य कोणत्याही रकमेचा समावेश करण्यात येऊ नये. मुद्रांक शुल्क, पंजीकरण शुल्क, वस्तू व सेवा कर, गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी लागणारे शासन शुल्क, विद्युत जोडणीसाठी लागणारे शासन शुल्क याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस, ॲमिनिटी चार्जेस, डेव्हलपमेंट चार्जेस, लिगल चार्जेस इत्यादीसाठी अतिरिक्त शुल्काची कोणत्याही लाभार्थ्याकडून मागणी करु नये.

५. **चारचाकी वाहन तळ (Car Parking) व दुचाकी वाहन तळ (TwoWheeler Parking) उपलब्ध करुन देण्याची तरतुद एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR)-२०२० मध्ये आहे.** इमारतीच्या मंजुर नकाशांमध्ये म्हाडाच्या सदनिकांसाठी आरक्षित असलेल्या खुल्या वाहन तळांचा स्पष्टपणे उल्लेख असावा. अशा खुल्या वाहन तळांसाठी कोणत्याही शुल्काची आकारणी करण्यात येऊ नये व बंदिस्त वाहन तळ (Covered Parking, Stilt Parking, Mechanised Parking, etc) विकत घेण्यासाठी कोणत्याही लाभार्थ्यांवर दबाव टाकू नये.

६. लाभार्थ्यांशी करारनामा केल्यानंतर त्याची एक प्रत विकासकाने मुख्य अधिकारी यांचेकडे अभिलेखासाठी सादर करावी.

७. सदनिकेच्या विक्री किंमतीमध्ये जुन्या नियमानुसार १०% किंवा UDCPR-२०२० च्या तरतुदीनुसार १% रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून अंतर्भूत आहे, म्हाडाकडे भरणा केलेली प्रशासकीय शुल्काची रक्कम देकार पत्रामध्ये नमुद करण्यात येईल लाभार्थ्यांनी उर्वरीत रक्कमेचा भरणा विकासकाकडे करावयाचा आहे.

८. १५% सामाजिक गृहनिर्माण अंतर्गत उपलब्ध सदनिकांच्या लाभार्थ्यांना योजनेस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या वर्षासाठी लागू असलेल्या वार्षिक दरसूची प्रमाणे सदनिका बांधकाम खर्चाच्या १०% रक्कम एकवेळेस (One time Maintenance) पायाभूत सुविधा देखभाल व इमारत दुरुस्तीच्या देखभाल खर्चापोटी ठेव स्वरुपात विकासकाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

९. यशस्वी झालेल्या अर्जदारांनी अनामत रक्कमेचा परतावा मागितल्यास अर्जासोबत भरलेल्या रक्कमेतून २५% रक्कम कपात करण्यात येईल. तापुरते देकार पत्र (Provisional offer Letter) दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारली किंवा कोणत्याही कारणास्तव वितरण रद्द करण्यात आल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रक्कमेतून, संबंधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १% एवढी रक्कम समपहरण करुन उर्वरीत रक्कम कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल. अर्जदाराने सदनिकेच्या विक्री किंमतीपैकी निरंक रक्कमेचा भरणा केल्यास तथा उपरोक्त समपहरण करावयाची रक्कम अनामत रक्कमेपेक्षा कमी भरल्यास, अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येणार नाही.

१०. सदर प्रकल्पामध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार समाईक पार्किग उपलब्ध असून या व्यतिरिक्त स्वमालकीचे कव्हर्ड पार्किग (उपलब्धते नुसार) हवे असल्यास विकासकाकडे संपर्क साधावा लागेल. तसेच पार्किगबाबत काही तक्रार असल्यास संबंधीत महानगरपालिका अथवा महारेरा कार्यालयाकडे दाद मागावी.

११. यशस्वी लाभार्थ्यांनी विकसकाकडून स्थापन होणाऱ्या गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.

१२. सदर योजनेतील सदनिका या एकात्मिक/ विशेष वसाहत प्रकल्पासाठी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मंजुर करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार म्हाडा मार्फत फक्त पात्र लाभार्थ्यांची यादी विकासकास द्यावयाची आहे.

१३. सदर सदनिकांची महानगरपालिकेच्या मंजुरी नुसार व महारेराच्या अटी व शर्टी नुसार विहित कालावधीत बांधकाम पूर्ण करुन ती लाभार्थ्यास ताब्यात देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित खाजगी विकासकाची आहे.

१४. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त असल्यास ताबा घेण्यापुर्वी भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकापासूनचा सोसायटी देखभाल खर्च व मनपाचा मिळकत कर, सदनिकेचे सेवाशुल्क इत्यादी करांचा भरणा सदनिका धारकास करावा लागेल.

१५. पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पी एम आर डि ए यांनी दिलेल्या भुअभिन्यास मंजूरी नुसार सदनिकाधारकास बाह्य सुविधा जसे बगिचा, क्लब हाऊस, पार्किंग इ. उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित विकासकाची असेल. याबाबात मंडळाकडे कुठलीही तक्रार करता येणार नाही.

१६. अदयावत गृहनिर्माण धोरणातील तरतुदी व म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार सोडतीची कार्यवाही करण्यात येईल.

१७. विजेत्या/प्रतिक्षा यादीतील अर्जदारास देकारपत्र प्राप्त झालेनंतर सदनिका समर्पित करावयाची असल्यास संबंधित विकासक यांचा अहवाल व ना-हरकत प्रमाणपत्र घेवून परतावा केला जाईल.

१८. संबंधित योजनेचा रेरा नंबर जाहिरातीत नमूद करण्यात येत आहे. त्यानुसार आपण महारेराच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देवून सोडतीत नमूद योजनेची माहिती घेवून ऑनलाइन अर्ज करण्यात यावे.

१९. सोडतीत दर्शविलेली योजनेच्या बांधकामाचा दर्जाबाबत किंवा इमारतीचा आराखडा व योजनेबाबत अन्य तक्रारी असतील तर त्या या कार्यालयांकडे अर्ज न करता विजेत्या/प्रतिक्षा यादीतील अर्जदाराने संबंधित प्राधिकरण/महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था अथवा रेरा यांच्याकडे तक्रारी/निवेदन देणे सोईस्कर होईल.

२०. विजेत्या/प्रतिक्षा यादीतील अर्जदाराने देकारपत्रात नमूद केलेली प्रशासकीय शुल्क उणे (-) असेल तर संबंधित विकासकांसोबत विक्री करारनामा केला असल्यास सूची-२ (Index-२) सादर करावा. तदनंतर परतावा अर्जदाराच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

टिप:- या व्यतिरिक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या इतर सुचना वाचुनच अर्जदाराने अर्ज भरावा.

ड) प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (म्हाडा योजना)

१. अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदारचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.
२. सदर व्यक्ती भारताचा नागरीक असणे आवश्यक आहे. तसेच आरक्षित प्रवर्गातील अर्जदारांनी गाळ्याचा ताबा घेण्यापुर्वी जात वैधता प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
३. सदर योजनेतील अर्जदारांना इतर उत्पन्न मर्यादा तसेच इतर सर्वसाधारण अटी शिथिल राहतील.
४. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावरील योजनेतील अर्जदारांनी ऑनलाईन अर्जची नोंदणी सुरु झाल्यानंतर अर्जासह पुढील प्रमाणे अनामत रक्कमेचा भरणा करावा.

अ.क्र	म्हाडा योजना उत्पन्न गट	अनामत रक्कम
१.	अत्यल्प उत्पन्न गट (Economical Weaker Section)	रु.२५,०००/-
२.	अल्प उत्पन्न गट (Lower Income Group)	रु.५०,०००/-
३.	मध्यम उत्पन्न गट (Middle Income Group)	रु.७५,०००/-
४.	उच्च उत्पन्न गट (Higher Income Group)	रु.१,००,०००/-

अनामत रक्कमेच्या पोहोच पावतीसह म्हाडा, पुणे या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे शाखेवरील धनाकर्षक (Demand Draft)/RTGF/NEFT व त्यासोबत भारताचा नागरीक असल्यास पुरावा (आधार कार्ड, मतदान ओळखपत्र,पॅन कार्ड) व आरक्षित प्रवर्गात अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र म्हाडा कार्यालय, पुणे येथे सुट्टीचे दिवस वगळून त्वरीत सादर करावेत. त्यानुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर सदनिकांच्या वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

५. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावरील योजनेच्या सदनिकेचा ताबा घेण्यापुर्वी वितरण दिनांकापासूनचा देखभाल खर्च (म्हाडा/ सोसायटी) व मनपाचा मिळकत कर, सदनिकेचे सेवाशुल्क इत्यादी करांचा भरणा सदनिका धारकास करावा लागेल.

६. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी https://lottery.mhada.gov.in/ या संकेतस्थळासोबतच https://bookmyhome.mhada.gov.in/ हे संकेतस्थळ नव्याने विकसित करण्यात आलेले आहे, या सदनिका सोडतीध्ये मागणी अभावी रिक्त असल्यामुळे या संकेतस्थळांवर वितरण होणाऱ्या सदनिकांसाठी स्वतंत्ररित्या जाहीरात प्रसिद्ध करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

विशेष सुचना:- यशस्वी झालेल्या अर्जदारांनी अनामत रक्कमेचा परतावा मागितल्यास अर्जासोबत भरलेल्या रक्कमेतून **२५%** रक्कम कपात करण्यात येईल.

इ) प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (१५% व २०% योजना)

१. अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदारचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

२. सदर व्यक्ती भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.

३. अर्जदाराची गटनिहाय वर्षिक कौटुंबिक कमाल मर्यादा (रुपये वार्षिक) खालीलप्रमाणे राहील. (महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांच्या शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१९/प्र.क्र.१२६/गृनिधो-२ दि.१६ मार्च २०२३ रोजीच्या सुधारीत परिपत्रकानुसार)

अ क्र	**उत्पन्न गट**	**सुधारित कमाल उत्पन्न मर्यादा (रुपये वार्षिक)**	
		मुंबई महानगर क्षेत्र MMR, पुणे महानगर क्षेत्र PMRDA, नागपूर महानगर क्षेत्र NMRDA, नागपूर सुधार प्रन्यास NIT प्रदेश तसेच १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था.	**उर्वरीत महाराष्ट्रतील स्थानिक स्वराज्यसंस्था अंतर्गत क्षेत्र.**
१.	अत्यल्प उत्पन्न गट (EWS)	रुपये ६,००,०००/- पर्यंत	रुपये ४,५०,०००/- पर्यंत
२	अल्प उत्पन्न गट (LIG)	रुपये ९,००,०००/- पर्यंत	रुपये ७,५०,०००/- पर्यंत

४. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावरील योजनेला जर भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त असल्यास ताबा घेण्यापुर्वी भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकापासूनचा सोसायटी देखभाल खर्च व मनपाचा मिळकत कर, सदनिकेचे सेवाशुल्क इत्यादी करांचा भरणा सदनिका धारकास करावा लागेल.

५. पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पी एम आर डि ए यांनी दिलेल्या भुअभिन्यास मंजूरी नुसार सदनिकाधारकास बाह्य सुविधा जसे बगिचा, क्लब हाऊस, पार्किंग इ. उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित विकासकाची असेल. याबाबात मंडळास कुठलीही तक्रार करता येणार नाही.

६. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी https://bookmyhome.mhada.gov.in/ हे संकेतस्थळ नव्याने विकसित करण्यात आलेले आहे. या सदनिका सोडतीध्ये मागणी अभावी रिक्त असल्यामुळे या संकेतस्थळांवर वितरण होणाऱ्या सदनिकांसाठी स्वतंत्ररित्या जाहीरात प्रसिद्ध करण्यात येणार नाही, संकेतस्थळावर वेळोवेळी याबाबत सुचना देण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. सदर सदनिकांच्या वितरणासाठी अविरत नोंदणी सुरु असून गरजू व पात्र अर्जदारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट देऊन सदनिका उपलब्ध असल्याची खात्री करुन अर्ज करावा.

८. सदनिका वितरणाच्या इतर महत्वाच्या अटी
(सर्व योजनांसाठी लागू)

१. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मिळकत व्यवस्थापन विनियम १९८१ मधील तरतूदीनुसार मंडळाच्या सदनिकेची ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत विक्री करता येणार नाही. (प्रधानमंत्री आवास योजनेसाठी १० वर्ष) सदनिकेची अनधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास संबंधित सदनिका धारकाविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

२. यशस्वी/ प्रतिक्षा यादीवरील पात्र ठरलेल्या अर्जदारांना कागदपत्रांची फेर तपासणी करावयाची वाटल्यास त्याचे अधिकार मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांना असतील.

३. यशस्वी व पात्र ठरलेला अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबापत्र अर्जदार व पती/ पत्नी या दोघांच्या नावे करण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र शासन पत्र क्र. न्यायाप्र -२०१५/प्र.क्र.१६८/गृनिभू/ गृनिवि, दि.२४/०९/२०१५ अन्वये संयुक्त नावे करण्यात येईल.

४. महानगर पालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मल:निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी लाभार्थ्यास/ सहकार गृहनिर्माण संस्थेस त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

५. लाभार्थी सदनिका धारकांना त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करुन ती पंजीकृत करुन घ्यावी लागेल. निर्माण झालेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासदत्व घेणे सदनिकां धारकांना बंधनकारक असेल. मंडळाची सर्व देय रक्कम अदा केल्यानंतर इमारती खालील व इमारत सभोवतीच्या अनुलग्न जमिनीचा भाडेपट्टा व इमारतीच्या मालकीचे अभिहस्तांतरण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे करण्यात येईल. सदनिकांची किंवा इमारतीची दुरुस्ती सदनिका धारकांनी किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेने स्वत: करावयाची आहे.

६. वितरीत झालेल्या सदनिकेच्या विक्री किंमतीवर महाराष्ट्र शासनाच्या आवश्यक मुद्रांक शुल्काचा भरणा, मुद्रांक शुल्क कार्यालय यांचेकडे तसेच सदनिकेचे आगाऊ वार्षिक सेवा शुल्क संबधित मिळकत व्यवस्थापक यांचे कार्यालयाकडे अदा करावे लागतील. तसेच शासनाच्या धोरणानुसार/ अधिसूचनेसार मंडळाने विक्रीकरीता काढलेल्या सदनिकेस विक्री किंमत व्यतिरीक्त वस्तु व सेवा कर (Goods & Services tax)/ देखभाल खर्च लागू झाल्यास सदर कर संबंधित कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच सदनिकेचा ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

७. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापक, व्रिक्री, हस्तांतरण व सदनिकोची अदलाबदल) विनियम, १९८१ भाग -३ विनियम-१९ अन्वये अर्जदाराने सोडतीसाठी अर्ज भरतांना वारसाचे नाव नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. जेणे करुन सदनिका वितरणापुर्वी दुर्देवाने अर्जदाराचा मृत्यू झाल्यास सदर सदनिकेचा ताबा देणेबाबत पुढील कार्यवाही नामनिर्देशित वारसाचे नावे करणे शक्य होईल. सोडतीपश्चात अथवा सदनिकेची रक्कम भरुन घेण्यासाठी देण्यात आलेल्या तात्पुरते देकार पत्रानंतर अर्जदाराचा मृत्यू झाल्यास त्यांचे नामनिर्देशित वारसदारास सदनिकेची रक्कम तात्पुरत्या देकार पत्रातील मुदतीनुसार अदा करणे आवश्यक राहील. सदनिकेची रक्कम विहीत मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यास सदकनिकेचे वितरण रद्द समजण्यात येईल. व प्रतिक्षा यादीवरील अर्जदाराला संधी देण्यात येईल. त्याच

बरोबर अर्जदाराने वारसाचे नाव नामनिर्देशित न केल्यास आणि वितरणापुर्वी अर्जदाराचा मृत्यु झाल्यास प्रतिक्षायादी कार्यान्वित करण्यात येईल.

८. या माहिती पुस्तकेत दिलेला तपशिल परिपूर्ण नाही, तो फक्त निर्देशक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थ्यांना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री,हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम १९८१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ च्या तरतुदी वेळोवेही होणाऱ्या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

९. प्रकल्पातील योजनांचे चटई क्षेत्रफळ, विक्री किंमत, सदनिकांची संख्या अंदाजित असून त्यामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१०. यशस्वी अर्जदारास त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी मागणी केल्यास सादर करणे बंधनकारक असेल.

११. जाहीरातीमधील म्हाडाच्या काही योजनांना भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) अप्राप्त असून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त झाल्यानंतर सदनिका वितरणाची कार्यवाही केली जाईल.

१२. विखुरलेल्या (वेगवेगळया ठिकाणी) सदनिका विक्री योजना- सदर सदनिका **जशा आहे त्या स्थितीमध्ये** विक्री करिता उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर सदनिका विखुरलेल्या असून या सदनिकांबाबत कोणताही दावा प्रलंबित असल्यास वितरण/ ताबा झालेला असल्यास पडताळणी अंती योग्य निर्णय घेण्यात येईल व सदरचा निर्णय अर्जदारास बंधनकारक असेल तसेच सदनिकांचे काही प्रलंबित शुल्क, कर इत्यादी बाकी असल्यास अर्जदारांना परस्पर भरणे बंधनकारक असेल या करांचा सदनिका विक्री किंमतीमध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

१३. सदनिका/योजनेच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयामध्ये दावा प्रलंबित असल्यास अथवा या पुर्वी सदनिकांचे वितरण झाले असल्यास, पडताळणी अंती योग्य निर्णय घेण्यात येईल व सदरचा निर्णय अर्जदारास बंधनकारक असेल.

१४. या जाहीरातीमध्ये व माहिती पुस्तकेत दिलेल्या तपशिल परिपूर्ण नाही, तो फक्त निर्देशक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थ्यांना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थ्यांना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापक, विक्री हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम १९८१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१, च्या तरतुदी वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्ण पणे बंधनकारक राहतील.

१५. **उत्पन्ना संबधित:-**

अ) विवाहीत अर्जदारास त्यांच्या जोडीदाराचे उत्पन्न ही दर्शवावे लागेल. जोडीदाराचे उत्पन्न नसल्यास त्यांना अर्ज करताना शुन्य (०) उत्पन्न दर्शवावे लागेल.

ब) पती-पत्नी यांनी वेगवेगळे अर्ज केले असल्यास दोघांच्याही उत्पन्नामध्ये तफावत आढळून आल्यास ते अर्ज बाद करण्यात येतील.

१६. **वैवाहिक स्थितीबाबत:-**

अ) योग्यती वैवाहिक स्थिती निवडावी लागेल.

ब) अर्जदार घटस्पोटीत असल्यास त्यांना तसे आदेश अपलोड करावे लागतील.

क) अर्जदार विधवा / विधूर असल्यास पती / पत्नीचा मृत्यु दाखला अपलोड करावा लागेल.

१७. **संरक्षण दल कुटुंब / माजी सैनिक** यांना स्वतंत्रपणे आपले प्रमाणपत्र अपलोड करावे लागेल.

१८. **अधिवास (डोमासाईल) प्रमाणपत्र:-** २०१८ नंतरचेच स्विकारण्यात येतील.

१९. आधार कार्ड व पॅन कार्डवरील नावे एक समान असणे आवश्यक आहे.

२०. **QR Code:** नमुना वाटप आदेश, वाटप आदेश, ताबापत्र, ताबा पावती इत्यादीवर QR Code दर्शविण्यात येईल.

२१. **DIGI Locker:-** अर्जदाराचे तसेच अर्जदाराच्या जोडीदाराचे आधारकार्ड व पॅनकार्ड हे DIGI Locker या वरूनच प्राप्त करून घेणे गरजेचे आहे, त्याकरीता अर्जदारास DIGI Locker वर नोंदणी करुन माहिती अद्यावत करणे आवश्यक आहे.

२२. **जाहीरातीमध्ये व माहिती पुस्तकेमध्ये अनावधानाने झालेल्या किंवा छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही.**

२३. संगणकीय सोडतीत कोणत्याही प्रकारे मानवी हस्तेक्षप होऊ शकत नाही. या करिता अर्जदारांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये.

२४. पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा या बाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी/ सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदरांनी कोणत्याही **अनधिकृत** व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला पुणे मंडळ/ म्हाडा जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदारास कोणी दलाल /व्यक्ती परस्पर म्हाडाच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी करताना आढळल्यास म्हाडाच्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, तसेच मुख्य अधिकारी/ पुणे मंडळ यांचे कार्यालयास कळवावे.

९. अर्जदारांना सादर करावयाच्या प्रमाणापत्राचा नमूना

The Maharashtra Housing and Area Development (Disposal of Land) Rules, 1981 Part-IV Miscellaneous Rule 13 Reservation of Tenements Sub Rule 3

"Freedom Fighter" means a person who receives pension duly granted by the Government of Maharashtra or the Government of India or who has been awarded a Tamrapatra or Sanmanpatra on account of his participation in the National Movement for emancipation of India or the next-of-kin or dependent of such person, namely, the widow or widower, father or mother, son, daughter, grand-son, grand-daughter, sons' wife, grandson's wife, widow of predeceased son or grand-son

- **Above definition is only for information and not necessary to include in the certificate to be issued by District Collector Office**

(Certificate format for Freedom fighter or legal heir of Freedom fighter to be issued by District Collector office On Letter Head)

CERTIFICATE

(For Freedom Fighter Only)

It is hereby certified that, Mr./Mrs…… Age…….. resident of …… is a Freedom Fighter who has participated in the National Movement for emancipation of India. This certificated is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date:
Place **Sign of Authorized Officer:**
Designation of Authorized Officer:

(For Freedom Fighters Next-of-kin or dependent persons Only)

CERTIFICATE

It is hereby certified that, Mr./Mrs……Age……. resident of …… is a (Relation of applicant with freedom fighter to be mentioned) of Mr./Mrs/Late…… Freedom Fighter. This certificated is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date:
Place:
Sign of Authorized Officer:
Designation of Authorized Officer:

The Maharashtra Housing and Area Development (Disposal of Land) Rules, 1981
Part-IV Miscellaneous Rule 13 Reservation of Tenements Sub Rule 5

"Families of Defence personal and personnel of Border Security Force, who have been killed or disabled or declared missing in 1962 Sino-Indian Conflict, or in 1965 or 1971 Indo-Pak Conflict, in any combat thereafter "

- Above definition is only for information and not necessary to include in the certificate to be issued by The District Welfare Board

(Certificate format for Families of Defence Personnel to be issued by District Welfare Board On Letter Head)

CERTIFICATE

It is certified that Mr./Mrs ..... Age ..... Resident at ……. is ..... (Relation of applicant with Defence personal and personnel of Border Security Force, who have been killed or disabled or declared missing in 1962 Sino-Indian Conflict, or in 1965 or 1971 Indo-Pak Conflict, in any combat thereafter) of .....Service No..... Rank..... had served in Defence/BSF force for ..... years.....Months..... Days--------From..... (Date) to .....(Date). He has been discharged from service on occasion of death / disabled / declared missing in war. This certificated is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date:

Place:

seal

Sign of Authorized Officer:

Designation of Authorized Officer:

District Welfare Board

The Maharashtra Housing and Area Development (Disposal of Land) Rules, 1981 Part-IV Miscellaneous Rule 13 Reservation of Tenements Sub Rule 6 [Ex-Servicemen and their dependents]

"ex-Serviceman " means a former member of the armed forces of the Union (not being a person who has ceased to be a member of the armed forces as a result of his being duly dismissed aftera court martial or on account of bad character or as a result of desertion or who has been arrested

- Above definition is only for information and not necessary to include in the certificate to be issued by by The District Welfare Board

(Certificate format for Ex-Servicemen and their dependents to be issued by The District Welfare Board On Letter Head)

CERTIFICATE

(For Ex-Servicemen only)

It is certified that Service No …….. Rank …….. Name ……of Regt /Corps /Unit/ Service ……..has been a member of Armed Forces of India. He has put in …….. years of military service in Army/Navy/Air Force from the date of enrollment/commissioning on …… & retired from service on ……..

His/her name has been registered in this office vide Identity Card No…… This certificated is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date :

Place :

seal

Sign of Authorized Officer:
Designation of Authorized Officer:
District Welfare Board

(For Ex-Servicemen's dependentsOnly)

CERTIFICATE

It is certified that (Name of Applicant - ……) Age…… Resident at…….. is (relation with ex-serviceman) & dependent of, Name …… Service No …….. Rank …….. of Regt /Corps /Unit/ Service …….. who has put in …….. years of military service in Army/Navy/Air Force from the date of enrollment/commissioning on …… and retired from service on ……..

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date :

Place : Sign of Authorized Officer:

Designation of Authorized Officer:
District Welfare Board

The Maharashtra Housing and Area Development (Disposal of Land) Rules, 1981
Part-IV Miscellaneous Rule 13 Reservation of Tenements Sub Rule 11

Artists in Film, Television, Drama, Tamasha, or Radio and also all other persons engaged in performing arts, including painters, sculptors, craftsmen, musicians (both vocal and instrumental) dancers, poets, kawals or mimics

- Above definition is only for information and not necessary to include in the certificate to be issued by The Directorate of Cultural Affairs, Maharashtra Government

(Certificate format for Artist to be issued by The Directorate of Cultural Affairs, Maharashtra Government On Letter Head)

CERTIFICATE

It is certified that, Mr/Mrs…….. have experience of ……. Years as a …… . This certificate is issued based on documentary evidence produced by applicant. As per documents he/she comes under an Artist category.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery Scheme only.

Date :

Place :

Sign of Director:

Directorate of Cultural Affairs,

Maharashtra Government

seal

(Certificate format for Journalist to be issued by Chief Public Relations Officer, Maharashtra Housing & Area Development Authority (MHADA))

CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs. ---------- is working with the ---------- on the post of ----------.

This certificate is being issued on the request by Mr. / Mrs. ----------, ----------to prove his/her eligibility in the journalist category in the MHADA housing Lottery .

This certificate shall not be used in any other place and for any other purpose other than the above mentioned purpose. If the documents submitted for obtaining this certificate are found to be false, fake or incorrect, you will be held responsible for the same. Also it should be noted that in such case MHADA will initiate legal action and cancel the allotment of the tenement. The Applicant will solely be responsible for the action.

This certificate is being issued to Mr./Mrs. ---------- on the submission of his appeal and submitted documents.

Date :

Place :

Sign of Authorized Officer:

Designation of Authorized Officer:

THE Maharashtra Housing and Area Development (Disposal of Land) Rules, 1981
Part-IV Miscellaneous Rule 13. Reservation of tenements Sub Rule (9)

State Government servants and employees of the Statutory Boards, Corporations, etc. (except the Maharashtra Housing and Area Development Authority) under the State Government including those who have already retired.

- Above definition is only for information and not necessary to include in the certificate issued by The Competent Office.

(Certificate format for employee of State Government / Corporation to be issued by The Competent Officer On Letter Head)

CERTIFICATE

This is hereby certified that, Mr./Mrs. …… is State Government servant / employee of the statutory board / Corporation on …… post. His / Her appointment Date is …… and working continuously for more than 5 years means ……. Years ……. month.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery reserved for State Government / Government Corporation employee.

Date :
Place:

Signature of Competent Officer _____

Name of Competent Officer: _____

SEAL

_____

Designation:_____

Department/Corporation:_____

Address of Department/Corporation:

_____

THE Maharashtra Housing and Area Development (Disposal of Land) Rules, 1981 Part-IV Miscellaneous Rule 13. Reservation of tenements Sub Rule (7)

[The MHADA (Disposal of Land) Rules, 1981 Part IV Miscellaneous Rule 13. Reservation of tenements sub rule (7) All sitting and ex-members of Parliament, Assembly or Council representing constituencies in Maharashtra]

- Above definition is only for information and not necessary to include in certificate issued by The Competent Office.
- (Certificate format for Member of Parliament / Member of Maharashtra Legislature to be issued by The Competent Officer On Letter Head)

CERTIFICATE

It is certified that Mr./ Mrs. …….. is sitting /ex – member of Parliament / Assembly / Council representing constituencies in Maharashtra for the Period from …….to ……. in the …….. Constituency.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery reserved for sitting and ex–member of Parliament, assembly or council representing constituencies in Maharashtra.

SEAL

Secretariat Of Parliament / Maharashtra Legislature

THE Maharashtra Housing and Area Development (Disposal of Land) Rules, 1981
Part-IV Miscellaneous Rule 13. Reservation of tenements Sub Rule (10)

Central Government Servants occupying staff quarters and due for retirement within three years or those who have already retired.

- Above definition is only for information and not necessary to include in certificate issued by The Competent Office.
- (Certificate format for Central Government Servants to be issued by The Competent Officer On Letter Head)

CERTIFICATE

It is hereby certified that Mr./Mrs. ……..is Central Government servant occupying staff quarter and due for retirement within three years or he /she is working / already retired. He / She working in …….. department on……. post. He/ She will retire / has retired on Date…… He / She is currently residing at …….. which is staff quarter allotted to him / her from Date …… and is currently in his / her possession.

This certificate is issued to avail benefit of residential tenement / plot under MHADA Lottery reserved for Central Government Servants occupying staff quarters and due for retirement within three years or those who have already retired.

Date :
Place:

Signature of Competent Officer _____

Name of Competent Office _____

SEAL

_____

Designation:_____

Department/Corporation:_____

Address of Department/Corporation:

_____

मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी कोणतेही कारण न देता, या गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत येणारे अर्ज स्विकारणे वा नाकारणे/सोडत रद्द करणे तसेच सर्व योजना किंवा एखादी विशिष्ट योजना रद्द करण्याचे अधिकारी राखून ठेवले आहेत.

माहिती पुस्तिकेतील अनावधानाने झालेल्या छपाईच्या चुकीचा फायदा अर्जदारास घेता येणार नाही.

१० (Help file)URL
https://housing.mhada.gov.in/

११. **QR Code वाचण्याची पद्धत**

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून सदनिकेसाठी ऑनलाईन पद्धतीने निर्गमित करण्यात येणाऱ्या देकार पत्रावर QR Code नमुद दर्शविण्यात येत आहे, सदर QR Code च्या खालील बाजूस अर्ज क्रमांक नमुद करण्यात येत आहे. देकार पत्राची खातरजमा करण्यासाठी त्यावर दर्शविण्यात येणारा QR Code वाचण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे.

अ. आपल्या मोबाईल वरुन **म्हाडाच्या अधिकृत** ॲपमध्ये लॉग इन करावे,
आ. त्यावरील मेनू बार (वरील डाव्या बाजूस आडव्या तीन रेषा) वर क्लिक करावे,
इ. मेनु बार वर क्लिक केल्यानंतर Verify Document हा पर्याय निवडावा,
ई. Scan QR Code या टॅबवर क्लिक करुन आपल्या मोबाईल कॅमेऱ्यामधून देकार पत्रावर दर्शविण्यात आलेला QR Code स्कॅन करावा.

टिप : QR Code वाचताना म्हाडाच्या अधिकृत ॲपचाच वापर करावा.

सदर प्रक्रियेद्वारे आपण देकार पत्राची खातरजमा करु शकता.

(स्वाक्षरीत)
(राहुल साकोरे)
मुख्य अधिकारी,
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
पुणे

सावधानतेचा इशारा:

(सर्व नागरिक तसेच विकासकांसाठी महत्वाचे)

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून सोडतीसंदर्भात निर्गमित करण्यात येणारे सुचनापत्र, देकार पत्र, तसेच पैसे भरणा केल्याच्या पावत्या या संगणकीकृत पद्धतीने अर्जदाराच्या लॉगइन मध्ये निर्गमित करण्यात येतील, तरीही त्याबाबत साशंकता असल्यास सदर कागदपत्रांची या कार्यालयाकडून खातरजमा करुन घेवू शकता.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा या बाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी/सल्ला देणारा वा प्रॉपर्टी सॉफ्टवेअर एजंट म्हाणून नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला पुणे मंडळ/म्हाडा जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदारास कोणी दलाल/व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा म्हाडाच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी करताना आढळल्यास मुख्य अधिकारी/ पुणे मंडळ यांचे कार्यलयास कळवावे.

मा.मुख्य अधिकारी/ पुणे मंडळ यांचा कार्यालयीन दूरध्वनी क्र.०२०-२६१२८८५६ / ०२०-२६१२८८६८.

अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्र.०२२-६९४६८१०० (Probity Software)

कोटक महिंद्रा बँक हेल्पलाईन :-

१. Babaji Rawool - babaji.rawool@kotak.com, +91 88889 66361

२. Dipti Fulare - dipti.fulare@kotak.com, +91 93212 77928

३. Deepali Thorat -deepali.thorat@kotak.com, +919561949235

फक्त अनामत रक्कम भरणा व परताव्यासंबंधी सुविधेकरीता हेल्पलाईन :-

१. श्री.सुनिल सुर्यवंशी - support.mhadapunelottery@easebuzz.in मो. ७०६६०४७२१२

support.mhadamumbai.board@easebuzz.in

२. श्री.अक्षय गायकवाड - support.mhadamumbai.board@easebuzz.in मो. ७२६२००३०८४